Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 । Secretary(P) : 25651750

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/ १०२६
दिनांक- २२/०२/२०२२

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय : सन २०२१-२२ या वर्षात परीक्षा देणाऱ्या इ. १० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देणेबाबत.**

**संदर्भ : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/ प्र.क्र.१७/ एसडी-२, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे दि.२१/०२/२०२२ चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे आयोजन अनुक्रमे दि. १५/०३/२०२२ ते दि. ०४/०४/२०२२ व दि. ०४/०३/२०२२ ते दि. ०७/०४/२०२२ या कालावधीत करण्यात आलेले आहे. कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७/एसडी-२ दि.२१/०२/२०२२ अन्वये सन २०२१-२२ या वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इयत्ता ७ वी व इ. ८ वी मध्ये सदर विद्यार्थ्याचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत.

तसेच सन २०२१-२२ या वर्षात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ. १२ वी पूर्वी इ. ९ वी व इ. १० वी मधील विद्यार्थ्याचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत. तसेच सदर सवलत ही केवळ सन २०२१-२२ च्या परीक्षेकरिताच देय राहिल असे शासनाने कळविलेले आहे.

तरी सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये इत्यादींच्या निदर्शनास आणून दयावी.

( डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र.मुंविमं/उमाप/ २९८७
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक- २७.०२.२०२२

प्रति,
प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(संगिता रोकडे)
प्र. विभागीय सहसचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग ( पश्चिम/दक्षिण/उत्तर ).
४प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.